**नियमीत दिवाणी मुकदमा नं. २४/२०१५ मधील निशाण २९ वरील आदेश**

CNR: MHSI05-000127-2015

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादीं तर्फे दाखल करण्यात आलेला असून त्यांनी असे नमुद केलेले आहे की वादीचे दाव्यातील परिच्छेद क्र. ३ ते ८ व १० याचे अवलोकन केले असता वादी हे आपण दावा मिळकतीचे निरंतर कायम कुळ आहोत, तसेच सर्व्हे नं. १३२ हिस्सा नं. १ या संपुर्ण जमिनीचे कुळ आहोत व फेरफार क्र. ८६८६ अन्वये ५९ व्यक्तींची नावे बेकायदेशीररित्या नोंदविण्यात आलेली आहेत अशा आशयाचे वादीचे कथन आहे. सबब प्रतिवादींच्या मते वादीने प्रथमत: ते सर्व्हे नं. १३२ हिस्सा नं. १ या संपुर्ण जमिनीचे कुळ आहेत आणि इतर व्यक्ती ज्यांची नावे सदर सर्व्हे वर्णनाच्या जमिनीला नोंदविली आहेत ते कुळ नाहीत हे शाबीत करणे आवश्यक आहे. त्यामुळे कोणत्याही निर्णय देण्याअगोदर न्यायालयास कुळपणाचा मुद्दयाबाबत उहापोह करणे आवश्यक आहे. त्यामुळे हा दावा या न्यायालयात चालण्यासारखा नाही. सबब त्याबाबत या न्यायालयाचा अधिकारक्षेत्राबाबतचा प्राथमिक मुद्दा काढणे व तसा मुद्दा काढून त्याचा प्रथम निर्णय देणे आवश्यक असल्याचे प्रतिवादीचे म्हणणे आहे.

२. या अर्जास निशाण ३४ येथे वादींनी आपले म्हणणे मांडलेले असून त्यांनी प्रतिवादींच्या अर्जाचे खंडण केले आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे दावा जमिन ही वादी कुटुंबाची कायम कुळहक्काची होती व तद्नंतर वादी कुटुंब ३२ग अन्वये दावाजमिनीचे कुळ खरेदीदार झालेले आहे. तशा आशयाची पक्षकथने या दाव्यात केलेली आहेत. त्या दावा जमिनीमधील वादी कुटुंबाच्या कायम कुळ हक्काबाबात अथवा मालकी हक्काबाबत कोणताही ठराव, हक्कज्ञापन, हक्कप्रस्थापना वादींनी दाव्याचे कामी प्रार्थित केलेली नव्हती व नाही. वादींनी प्रस्तुतचा दावा त्यांच्या कब्जाच्या संदर्भात दाखल केलेला आहे. सबब त्याकरीता त्यांना या दाव्यामध्ये कब्जाचे स्वरुप विषद करणे आवश्यक व अनिवार्य असल्यामुळे दावा जमिनी बाबतची पक्षकथने या दाव्यामध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहेत. मात्र, त्या पक्षकथनांचे संदर्भाने अगर त्याच्या अनुषंगाने किंवा त्याच्या आधाराने कोणतीही हक्क प्रस्थापनेची दाद वादींनी या दाव्यात प्रार्थित केलेली नाही. सर्व्हे नं. १३२ हिस्सा नं. १ या जमिनीपैकी जे क्षेत्र दावा जमिनीमध्ये समाविष्ठ झालेले नाही त्या क्षेत्रातील वादी कुटुंबाची हक्कसंबंध, कब्जा, भोगवट, कसवट व वहिवाट यांचे संदर्भातील वस्तुस्थिती प्रस्तुत दाव्यात प्रतिपादीत करणे आवश्यक होते, कारण त्या शिवाय प्रस्तुत दाव्याचे कामी वादीने प्रतिवादीं विरुध्द उभारलेल्या तक्रारींचे व हरकतींचे सम्यक आकलन होणे शक्य नव्हते असे देखील

प्रतिवादीचे म्हणणे आहे. सबब त्या सर्व्हे मधील जे क्षेत्र दावा जमिनीत समाविष्ट नाही, त्या क्षेत्राबाबत कोणतीही दाद वादींनी प्रार्थित केलेली नाही. त्यांनी पुढे असे नमुद केले आहे की या दाव्याचा निर्णय देताना न्यायालयाला सर्व्हे नं. १३२ हिस्सा नं. १ या जमिनीतील वादींच्या कुळहक्काबाबत अगर कुळ खरेदीदार हक्काबाबत कोणताही उहापोह करण्याची आवश्यकता नव्हती व नाही व तसा अधिकार या न्यायालयाला नाही. प्रस्तुत दाव्याचे कामी उभय पक्षकारांकडून उपस्थित करण्यत आलेले अगर यापुढे उपस्थित करण्यात येणारे कुळ हक्क विषय मुद्दे गिर्णीत होणे या न्यायालयाला आवश्यक वाटल्यास, त्या संदर्भात योग्य ते वादाचे मुद्दे निर्धारीत करुन त्या मुद्दयांचा महाराष्ट्र कुळ कायदा अंतर्गत कलम ८५अ अन्वये टेनन्सी प्राधिकरणाकडे पाठविण्याचा अधिकार या न्यायालयाला आहे. सबब तुर्तातुर्त ताकिदीच्या अर्जावर निर्णय देताना दिवाणी न्यायालयाने वाद विषयक जमिनीतील कुळहक्का बाबतच्या मुद्दयावर मतप्रदर्शन करणे आवश्यक नसते. सबब कोणत्याही दिवाणी दाव्यात कुळहक्क विषयक मुद्दा उपस्थित झाल्यास तो मुकदमा दिवाणी न्यायालयाच्या अधिकारीतेच्या कक्षेबाहेर जात नाही. मात्र कुळ हक्काबाबत ठराव प्रार्थीत केल्यास, न्यायालयाच्या अधिकारीतेच्या कक्षेबाहेर जातो, अशी मागणी या दाव्यात न केल्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजुर करावा अशी मागणी प्रतिवादींनी केली आहे.

३. उभय पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला. सदर एक प्रस्थापित कायद्याचा सिध्दांत आहे की ज्यावेळेस दावा हा कुळकायद्या संदर्भातील अधिकाराबाबत आहे त्यावेळेस त्याबाबतचा ठराव अगर हक्कस्थापना दिवाणी न्यायालयाला करता येणार नाही. दावा जरी कायम मनाईसाठी दाखल करण्यात आला असला, तरी देखील तशा स्वरुपाचा मुद्दा उपस्थित राहु शकतो. मात्र, असे जरी असले तरी प्रतिवादींनी नमुद केल्याप्रमाणे ज्यावेळेस दाव्याचे कामी तुर्तातुर्त ताकिदीचा अर्ज प्रलंबित आहे, तेव्हा प्रथमदर्शी बाजु पाहुन न्यायालयाला निर्णय दयायला हवा. त्यावेळेस न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राबाबतचा मुद्दा किंवा कुळपणाच्या मुद्दयाबाबत सखोल विवेचन करणे अपेक्षित नाही. प्रतिवादींनी ज्या स्वरुपाची हरकत घेतलेली आहे त्यास अनुसरुन या दाव्याचे संदर्भात मुद्दे निश्चीत करताना, मुद्दा काढणे आवश्यक वाटल्यास हे न्यायालय मुद्दा काढू शकते. सबब, ज्याअर्थी या दाव्यात आता तुर्तातुर्त ताकिदीचा अर्ज प्रलंबित आहे, त्याअर्थी प्रतिवादींनी केलेली मागणी या क्षणाला मान्य करता येणार नाही. सबब मी खालील आदेश पारित करतो.

अर्ज नामंजुर करण्यात येतो.

सही/—

दिनांक— २/१/२०१९

विनायक द. पाटील

दिवाणी न्यायाधीश क.स्तर वेंगुर्ला.